**नियमीत दिवाणी दावा क्र.६७५/२०१८ मधील निशाणी क्र.२५ वरील आदेश**

( CNR : MHAH250016652018 )

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी केलेला आहे. वादीने निशाणी क्र.२६ वर सदर अर्जाचे पुष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

२. वादींनी प्रस्तुतचा दावा हा मोजणी, अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाव्दारे वादीने सदर दाव्यातील दावा कलम २ मधील पान नं.२ वरील ८व्या ओळीमध्ये "नवीन आर.सी.सी. बांधकाम" याऐवजी "नवीन पत्रा शेड टाकून" असा मजकूर नमुद करणेबाबत दुरुस्ती करणेची परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, नजरचुकीने व हस्तदोषाने दावा कलम २ मध्ये "नवीन आर.सी.सी. बांधकाम" असे लिहीले गेले आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक आणि फॉर्मल स्वरुपाची असून सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही तसेच प्रतिवादींवर कोणतीही हार्डशीप होत नाही. त्यामुळे वादींनी वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देऊन अर्जास विरोध केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जात नमुद केलेले कारण योग्य व कायदेशीर नाही. सदरचा अर्ज मंजुर करणे मे. कोर्टास योग्य वाटले तर जास्तीत जास्त खर्च प्रतिवादींना देण्याचा हुकूम व्हावा.

४. वादीचे व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्ती करता येईल. सदर आदेशामध्ये असे नमूद आहे 'की, *दाव्यामध्ये पक्षकारांना त्यांच्या प्लीडींगमध्ये कधीही दुरुस्ती करता येईल, जर ती दुरुस्ती दोन्ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण होण्यासाठी आवश्यक असेल. त्याच आदेशामध्ये दाव्याचा पुरावा चालू झाल्यानंतर दुरुस्ती करता येणार नाही*' असे नमूद केलेले आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता व दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ च्या तरतुदी लक्षात घेता असे दिसुन येते की, सदर दाव्यामध्ये अद्यापपावेतो मुद्दे काढलेले नाहीत. वादींनी प्रस्तुतचा दावा हा मोजणी व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल

केलेला आहे. त्यामुळे वादीचे व प्रतिवादीची कथने विचारात घेता वादीने मागितलेली दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची आहे. सदर दुरुस्ती केल्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. वादीने प्रस्तावित दुरुस्तीव्दारे केलेले कथन सिध्द करण्याची संपूर्ण जबाबदारी ही वादीवर असणार आहे. त्यामुळे प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्यामध्ये स्पष्टता येऊन दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (निशाणी क्र.२५) मंजुर करण्यात येतो.

२. वादीने सदरची दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

सही/-

**( मयुरा व्ही. निंबाळकर )**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पारनेर**

**दि.२२.१२.२०२१**
**पारनेर**